# गांधी विचारांची सदयकालीन उपयुक्तता

***डॉ.विश्वनाथ महादेव आवड***
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख*
*शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज*
*ता.माळशिरस जि.सोलापूर*

**प्रस्तावना :**

दिल्ली विधानसभेच्या निवडणूका संपल्या . निकालही आले बहुमत मिळून सत्ता स्थापन झाली पण दिल्लीत नागरीकत्वाच्या मुदयावरून सुरू झालेले राजकारण व त्यातूनच घडलेली धार्मीक दंगल या पार्श्वभुमीवर एक गोष्ट प्राकर्षाने जाणविली ती म्हणजे उसळलेल्या दंगली शांत करण्यासाठी एकाही राजकीय पक्षाचा नेता फिरू शकला नाही किंवा जमावास शांत करू शकला नाही. देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजीत डोभाल यांना उतरावे लागले याचाच अर्थ भारतातल्या कोणत्याही राजकीय व्यक्तीकडे जनसमुहाला समजावून सांगण्याची नैतीकता शिल्लक राहीलेली नाही.अशा परीस्थीतीत महात्मा गांधी विचारांची आपणास पुन्हा पुन्हा मांडणी करावी लागते.

गांधी विचाराची आवश्यकता प्रतीपादन करीत असताना गांधी विचार हा केवळ धो धो पडणारया पावसा सारखा वाहून नाही गेला पाहिजे तर तो थेंब थेंब झिरपला पाहिजे. आजच्या परीस्थीतीत निर्माण झालेले प्रश्न गांधीजीनी कसे सोडविले असते या परीस्थीतीत त्यांनी पळ काढला असता का ..का धैर्याने सामोरे गेले असते याचे विवेचन खालील मांडणीमध्ये करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**गांधी विचारांची का आवश्यकता आहे :**

१. सामाजिक मुल्यांची व नैतीकतेची चीरफाड होत असताना, सामाजिक जाणिवांचा पराभव होत असताना गांधी विचारच तारक ठरू शकतो म्हणून आजही गांधी विचार आवश्यक वाटतो.

२. आजच्या काळात केवळ गांधी विचार उपयुक्त आहेत हे सांगून चालणार नाही तर त्याची उदाहरणे समाजासमोर, तरूणांच्या समोर उभी करावी लागतील तरच केवळ गांधी विचारांची खोली व उंची न मांडता गांधी स्वत:ला पाहीजे तसे मांडून गांधीजीना हायजॅक केले जाणारे प्रयत्न थांबविता येतील.

३. आजची पिढी प्रेरणांच्या शोधात असताना गांधीजी आजच्या समाजातल्या सर्व प्रेरणांची प्रेरणा होते म्हणून गांधी विचारांची आवश्यकता आहे.

४. आजच्या संवाद संपलेल्या व संवाद संपविलेल्या काळात गांधीजी सांगणे अत्यावश्यकच बनते कारण गांधीजीनी त्यांच्या अनेक टीकाकारांना संवादातून उत्तरे दिली आहेत.

**शंभर वर्षापुर्वीची व आजची परीस्थिती :**

जगाची शंभर वर्षापुर्वीची परीस्थीती १९२० पहिले महायुध्द संपले होते.जागतीक शांततेसाठी लीग ऑफ नेशन म्हणजेच राष्ट्रसंघाची उभारणी सुरू झालेली होती. १९४५ ला दुसरे महायुध्द संपले व संयुक्त राष्ट्रसंघाची मांडणी सुरू झाली. आपणास गांधीजींच्या कार्यकतृत्वाचा आलेख मांडताना लक्षात येते की त्यांचा भारतातला कालखंड हा १९२० ते १९४८ हाच राहिलेला आहे. एकीकडे जग विविध संस्थाच्या माध्यमातून शांततेच्या प्रयत्नांना सुरवात करीत होते तर गांधीजी प्रत्यक्षात शांतता प्रस्थापीत करीत होते.

शंभर वर्षापुर्वी जागतीक राजकारणात हिटलर, मुसोलीनी, जनरल फ्रॅन्को, हे युध्दखोर नेते होते.आजही ट्रंप, किम जोंग, पुतीन असे राजकीय नेते युध्दांची भाषा करताना दिसतातच.

शंभर वर्षापुर्वी गांधीजीनी शेतकरी व कामगार यांच्या प्रश्नांना खेडा व चंपारण्य सत्याग्रहाच्या माध्यमातून हात घातलेला होता.आजही भारतातले शेतकरी व कष्टकरी यांचे प्रश्न जसेच्या तसेच आहेत.

आज शंभर वर्षानंतर हिंदू मुस्लीम. जातीयता या सारखी अनेक अव्हाने जशीच्या तशी आहेत.या प्रश्नांना प्रतीक्रीया देवून भुमिका घेणारे गांधीजी नाहीत म्हणून आज गांधीजी पुन्हा सचेतन करावे लागतील.
ग्रेटा थर्नबर्ग नावाची छोटीशी मुलगी संयुक्त राष्टसंघाच्या व्यासपिठावर जावून आम्हाला भविष्यासाठी चांगले पर्यावरण पाहिजे असे सांगते गांधीजी तेच शंभर वर्षापुवी सांगत होते.

तामीळनाडूतील सालेम जिल्हयात एका महिलेने मुलांचे पोट भरण्यासाठी स्वत:च्या डोक्यावरील केस विकले म्हणजे आज आपण याच देशातल्या जनतेच्या अन्नाची गरज पुर्ण करू शकत नसू तर गांधीजी १०० वर्षापुवी अत्योंदयाची भुमिका मांडत होते.

जगात व भारतात सर्वच पक्षीय नेत्यांनी टोकाची विचारधारा स्वीकारल्या आहेत.मानवी अधिकारांची सर्रास पायमल्ली होते आहे पर्यावरण करारातून मोठी राष्ट्रे माघार घेत आहेत अशातून निर्माण होणारया संकटांना तोंड देण्यासाठी गांधी आवश्यक वाटतात.

**भारताचे घसरलेले निर्देशांक :**

खालील निष्कष युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट नेटवर्क यांनी काढलेले आहेत.

१. लोकशाही निर्देशांक : २०१८ साली भारत जगातील १६५ देशांपैकी ५१ व्या स्थानी होता तो आज ६१ व्या स्थानी आहे.

२. हॅपीनेस निर्देशांक : जगातील १८९ देशांपैकी भारत २०१६ साली ११७ व्या स्थानी
२०१७ साली १२२ व्या स्थानी
२०१८ साली १३३ व्या स्थानी
२०१९ साली १४० व्या स्थानी

३. मानवी विकास निर्देशांक : १८९ देशांपैकी १२९ : १३०

४. प्रेस फ्रीडम निर्देशांक : २०१७ साली १३६
२०१८ साली १३८
२०१९ साली १४०

वरील निर्देशांकाचा विचार करता परीस्थीती नेमकी लक्षात येते सत्ताधारी कोणीही असो अम्हाला व्यवस्थीत शिक्षण नाही. शिक्षणात गुणवत्ता नाही. आरोग्याच्या सुविधा नाहीत. दारीद्र आम्हाला सांगता येत नाही अशा प्राप्त परीस्थीतीत भारतीय समाज जीवनातल्या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करून त्याप्रश्नाकडे सकारात्मकतेने पाहणारया गांधीजीं जास्त गरजेचे वाटतात.

**आम्हाला गांधीजी का हवेत :**

१. शहरे बकाल होत असताना परस्परावलंबी असलेल्या खेडयाकडे चला म्हणत शाश्वत विकास सांगणारे व खेडी समृध्द करण्यास सांगण्यासाठी गांधीजी हवे आहेत.

२. शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल सांगत मुल्यावर अधारलेली नई तालीम सांगणारे गांधीजी हवे आहेत

३. हाताला काम. कामाला दाम व दामाला प्रतीष्ठा सांगणारे गांधीजी हवे आहेत.

४. गांधीजींचा ऱाम हा केवळ धनुष्य हाती घेतलेला राम नव्हता तर गांधीजी आपला राम रहिम. येशू आणि बुध्दामध्ये पाहत होते. अशा धर्मनिरपेक्ष भारतासाठी गांधीजी हवे आहेत.

**गांधीवादी विचारांनी कोणी प्रयत्न केले आहेत किंवा करीत आहेत.**

१. ठाकूरदास बंग. अभय बंग . राणी बंग . अमूत बंग : खेडयाकडे जावा गरीबीचा अभ्यास करा हे गांधीजींनी सांगीतलेला मुलमंत्र जपत कार्य केलेले बंग कुटुंबीय. यावरच अधारीत अमर्त्य सेन व अभिजीत बॅनजी यांनी भारतीय अर्थशास्त्र मांडून नोबेल पुरस्कार मिळविले.

२. रघुनाथ माशेलकर : कमीत कमी कामात जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्यासाठी अहोरात्र झटत आहेत.

३. विवेक सावंत सी डॅक महासंगणकाची निर्मीती करून एम एच सी ई टी सारखा कोर्स सर्वसामन्यांना परवडेल अशा किंमतीत सुरू केला.

४. जयंत पाटील कोसबाड : वैरण विकास कार्यक्रम शेतकरी व कष्टकरी यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न याव्दारे केलेले आहेत.

या व अशा अनेकांनी गांधी विचार प्रमाण मानून प्रामाणिक प्रयत्न केलेले आहेत.

**गांधी विचार प्रत्यक्षात येणेसाठी आपण काय करावे.**

गांधी विचारांची निश्चीतच आवश्यकता आहे यात शंकाच नाही पण गांधी विचारातून मी काही करू शकतो हे पाहणे महत्वाचे ठरेल.

१. मी जात मुक्त भारतासाठी प्रयत्न करेन.

२. मी देशातल्या कोणाचाही व्देश करणार नाही. दंगल घडू देणार नाही.

३. स्त्री पुरूष समानतेचे आचरण करेन.

४. मी माझ्या व्यवसायातून अंत्योंदय सारख्या स्वप्नांना प्रत्यक्ष आणण्यासाठी पयत्न करेन.

५. रचनात्मक कार्य करेल

६. घटनेच्या नियमांचे पालन करेल.

**संदर्भ ग्रंथ:**

१. गांधी जीवन व चरीत्र : लुई फिशर अनुवाद वि.रा. जोगळेकर

२. आणि गंगेत गगन वितळले : अबरीष मिश्र

३. गांधी मानव व महामानव : जगन फडणीस

४. गांधी : नलीनी पंडित.

५. किशोर बेडकीहाळ यांचे व्याख्यान.

६. अन्वर राजन : यांचे व्याख्यान.

७. सतिष देशपांडे यांचे व्याख्यान.

८. युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट नेटवर्क यांचा अहवाल.

९. लोकसत्ता वर्तमानपत्र.

१०. इंटरनेटवरील विविध लेख.

■ ■ ■ ■ ■